


# दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com RNI NO-MAHMAR/2022/90217
वर्ष ३ रे अंक : ३४९ वा बुधवार दि २२ एप्रिल २०२६ पृष्ठ ८ किमंत ३ रुपये

# मी येऊ शकत नाही, पण तुम्ही सुनेत्रा पवारांना विजयी करा!
## पवारांचं बारामतीकरांना भावनिक आवाहन

वृत्तसंस्था/मुंबई

बारामती विधानसभा पोटनिवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवार आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांना विजयी करण्याचं आवाहन शरद पवारांनी केलं आहे. अजित पवार यांच्या अकाली निधनामुळे बारामतीत पोटनिवडणूक होत आहे. या निवडणुकीत कोणत्याही प्रमुख पक्षानं सुनेत्रा पवार यांच्या विरोधात उमेदवार दिलेला नाही. प्रकृती अस्वास्थामुळे राष्ट्रवादी काँग्रेस शपचे अध्यक्ष शरद पवार यांना बारामतीच्या पोटनिवडणुकीत मतदान करता येणार नाही. त्या पार्श्वभूमीवर शरद पवारांनी बारामतीकरांसाठी भावनिक पोस्ट केली आहे. सुनेत्रा पवारांना भरभरुन मतदान करण्याचं आवाहन शरद पवारांनी बारामतीकरांना केलं आहे. मी १९६७ मध्ये लढविलेल्या पहिल्या निवडणुकीपासून बारामती मतदारसंघातील माझ्या मतदानाचा हक्क अखंडपणे बजावला. आता २०२६ मध्ये बारामती विधानसभा मतदारसंघात महाराष्ट्राचे एक लाडके व लोकप्रिय नेते स्व. अजित पवार यांच्या दुर्दैवी, अपघाती निधनाच्या शोकात्म पार्श्वभूमीवर ही पोटनिवडणुक होत आहे. या पोटनिवडणुकीसाठी बारामती येथे येऊन आतापर्यंतच्या प्रघातानुसार मतदान करण्याचे मी ठरवले होते. दुर्दैवाने माझी प्रकृती बिघडल्याने मला मुंबईत रुग्णालयात दाखल व्हावे लागले. डॉक्टरांनी मला उपचार आणि सक्तीची विश्रांती या कारणास्तव मुंबईबाहेर जाण्यास मनाई केली आहे. त्यामुळे अत्यंत नाईलाजास्तव मतदानाचा हक्क बजावण्यापासून मला वंचित रहावे लागत आहे, हे मी अत्यंत व्यथित आणि खेदपूर्ण अंत:करणाने सांगू इच्छितो. माझ्यावर अथक प्रेम व विश्वास असलेले बारामतीचे नागरिक, मतदार व कार्यकर्ते मला समजुन घेतील याची मी खात्री बाळगतो. आमच्या पक्षाने (राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार) या पोटनिवडणुकीत श्रीमती सुनेत्रा अजित पवार यांना पाठिंबा जाहिर केला आहे. स्व. अजित पवार यांना ही एकप्रकारे आमच्या पक्षातर्फे श्रद्धांजलीच आहे. माझे बारामतीमधील सर्व मतदारांना आवाहन आहे की, त्यांनी श्रीमती सुनेत्रा अजित पवार यांना मतदान करून स्व. अजित पवार यांना श्रद्धांजली अर्पण करावी. बारामतीमधील मतदार यांनी माझ्यावर प्रदीर्घ विश्वास ठेवलेला आहे. ते या आवाहनास प्रतिसाद देतील, असा मला विश्वास आहे.



मतदानासाठी प्रत्यक्ष न येता निवडणुक आयोगाच्या विविध पर्यायांचा देखील मी तपास केला व विचारणा केली. परंतु ते पर्याय उपलब्ध नसल्याचे राज्याच्या निवडणुक अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले. अखेर अतिशय व्यथित व जड अंत:करणाने मला मतदानापासून दूर राहण्याचा निर्णय करावा लागला. या पोटनिवडणुकीत श्रीमती सुनेत्रा अजित पवार यांना मतदान करावे, असे मी बारामतीकरांना पुन्हा एकदा आवाहन करतो.

# चाणाक्य नितीत वावरणारे डॉ. किशोर केला यांना करोडो रुपयांचा चुना!
## पुण्याच्या डॉनची दादागिरी; ज.जामोदच्या डॉ.किशोर केला २६ कोटींना फसले!

जनसंचलन/बुलढाणा

जिल्ह्यातील आर्थिक गुन्ह्यांमध्ये मोठी खळबळ उडवणारा २६ कोटी रुपयांचा फसवणुकीचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. जळगाव जामोद येथील डॉ. किशोर किसनलाल केला (वय ६५) यांची विश्वासघातकी पद्धतीने तब्बल २६ कोटींची फसवणूक केल्याचा गंभीर आरोप पुण्यातील कन्हैयालाल देविचंद छोरीया आणि त्याचा मुलगा अनमोल छोरीया यांच्यावर करण्यात आला आहे. तक्रारीनुसार, आरोपींनी सुरुवातीला मोठ्या प्रॉपर्टी प्रोजेक्ट्सचे गोड स्वप्न दाखवत डॉक्टरांचा विश्वास संपादन केला. मोठा प्लॉटिंग प्रकल्प उभा करून कोट्यवधींचा नफा मिळवून देतो असे आश्वासन देत त्यांनी डॉक्टरांना भागीदारीत ओढले. यासाठी आरोपी वारंवार त्यांच्या घरी भेट देत, मोठ्या उद्योग-व्यवसायाच्या गप्पा मारत प्रभाव निर्माण करत होते. यानंतर आरोपींनी पुण्यातील भव्य कार्यालय, शेकडो कर्मचारी, सीए आणि नामांकित वकील असल्याचे सांगत सर्व कायदेशीर जबाबदारी स्वतःकडे घेतली. डॉक्टरांकडून




कोट्यवधींची गुंतवणूक करून घेतल्यानंतर, नंदुरबार व मलकापूर प्रकल्पांतून १२ कोटींपेक्षा अधिक रक्कम उभी करण्यात आली. मात्र, या व्यवहाराचा एकही हिशेब न देता आरोपींनी संपूर्ण रक्कम स्वतःसाठी हडप केल्याचा आरोप आहे. इतक्यावरच न थांबता, आरोपींनी डॉक्टरांची जमीन २५ कोटींच्या कर्जासाठी तारण ठेवून त्यांना जामीनदार बनवले. तसेच प्रकल्पातील प्लॉट विक्रीतून मिळालेली मोठी रक्कम स्वतःच्या कर्जफेडीसाठी वापरली. डॉक्टरांनी हक्काची रक्कम मागितल्यावर आरोपींनी तब्बल २५.९२ कोटींचे धनादेश दिले, मात्र खात्यात पैसे नसल्याने ते बाऊन्स झाले. नंतर बँकेतून स्टॉप पेमेंट करून आरोपींनी आपली गुन्हेगारी उघड केली. धक्कादायक बाब म्हणजे, आरोपींच्या कार्यालयातून डॉक्टरांना छोरीया पिता-पुत्र पुण्याचे डॉन आहेत अशी उघड धमकी देण्यात आली. यामुळे डॉक्टर आणि त्यांच्या कुटुंबाच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे. या गंभीर प्रकरणाची दखल घेत बुलढाणा पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून तपास आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात आला आहे.

# राजकरण अलग बात हैं....

बावन बुर्जी करवंड गावातील छत्रपती शिवाजी महाराजांचा विवाह स्मृती सोहळ्याचे मूळ पत्रकारितेच्या प्रबोधनातून. ही सत्य घटना आहे सन २०२१ मधील माझं मूळ गाव छत्रपती शिवाजी महाराजांची सासुरवाडी असलेले बावन बुर्जी करवंड. खरं तर गावाला असा ऐतिहासिक वारसा लाभलेला असतांनाही गाव मात्र ज्ञानगंगा अभयारण्याच्या पायथ्याशी निपचित पडलेलं. बहुतांश गावातील लोकांचे उदरनिर्वाह शेतीवरच सिंचनाचा पर्याय नसल्याने निसर्गावर अवलंबूनच शेती केल्या जाते त्यातच रोजगार हा खूप मोठा प्रश्न असल्याने २०११ मध्ये मी गाव सोडलं अन् चिखली शहरात वास्तव्यास आलो. चिखलीकरांनी भरभरून सहकार्य केले अन् आयुष्यात पैसाच नाही तर नाव पण कमावलं. कधी गावात जाणे झालेच तरी गावातील बालपणाचा ओसाड राजवाडा, तटबंदी असलेल्या भिंती, गढ्या यांचे आकर्षण वाटायचे. गावातील परिचयाचे वृद्ध लोक गावातील इतिहासाबद्दल खूप काही सांगायचे त्यामुळे नेहमीच गावातील इतिहासाबद्दल जिज्ञासा होतीच. गढीच्या पांढऱ्या मातीखाली दडलेला गावाचा इतिहास उजागर झाला पाहिजे. गावातचशिकलोमोठाझालोत्यामुळेगावातीलसमस्यांचीमलाजाणीवहोती. गावातील या इतिहासाला प्रसिद्धी मिळावी, जलपुरुष स्वर्गीय भारतभाऊ बोंद्रे यांनी मंजूर केलेले धरण झाल्यास सिंचनाची व्यवस्था होईल व शेतकरी सक्षम होईल, अभयारण्याच्या पायथ्याशी असल्याने जंगल सफारी गावाला पर्यटनक्षेत्र म्हणून प्रसिद्धी मिळाल्यास गावात रोजगारपण निर्माण होईल अशी ईच्छा होती.

छत्रपती शिवाजी महाराजांची सासुरवाडी व महाराणी गुणवंताबाई इंगळे यांचे गाव बावन बुर्जी करवंड जो पर्यंत प्रसिद्धी माध्यमावर येणार नाही तो पर्यंत लोकांचे आकर्षण वाढणार नाही. याची मनोमन जाणीव होती ०९/१०/२०२१ रोजी गावात गेलो गावातील मित्र संतोष जऱ्हाड, रामेश्वर राठोड, अक्षय करंडे, सोनू सपकाळ, लक्ष्मीनारायण सुर्वे यांच्या सहकार्यातून व गावातील वयस्क व्यक्ती सुभाषराव करंडे यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे तसेच बालपणाचे गावातील चित्र भौगोलिक परस्थिती पाहता १०/१०/२०२१ रोजी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पत्नी गुणवंतीबाई इंगळे यांचे गाव बावन बुर्जी करवंड चा राजकारण्यांना विसर या मथळ्याखाली पहिला लेख सोसियल मीडियावर प्रसिद्ध केला. पत्रकारितेतील मित्र वर्ग यांनी माझ्या लेख ची दखल घेत आमचा मुखपत्र साप्ताहिक विदर्भ का काशीद, पुण्य नगरी, आम्ही चिखलीकर, वृत्तधर्म, विदर्भ दर्पण, लोकमत, दिव्य मराठी व ईतर वृत्तपत्र तसेच डिजिटल मीडियातील यूट्यूब चॅनेलवर ही बातमी प्रसिद्ध केली.

क्रियेची प्रतिक्रिया ही कधीच त्वरीत होत नसते त्यासाठी संयम आणि योग्य वेळेची वाट पाहावी लागत असते. या बातमी नंतर खूप सकारात्मक प्रतिक्रिया आल्या त्यातून माजी पंचायत समिती सदस्य अरविंद बापू देशमुख यांची ओळख झाली त्यांनी याविषयी खूप माहिती दिली, हंबीरराव मोहिते यांचे वंशज बाळासाहेब मोहिते यांच्याशी चर्चा झाली, लक्ष्मीनारायण छबुराव सुर्वे यांनी करवंड गावाचे वतनदार या गावाला वसवणारे व छत्रपती शिवाजी महाराज सासरे सरदार शिवाजीराव इंगळे यांचे वंशज हरिरुद्र प्रतापरुद्र इंगळे यांची ओळख करून दिली. त्यावेळी हरिरुद्र प्रतापरुद्र इंगळे हे तमिळनाडू येथील तंजावर येथे वास्तव्यास होते. इकडे पण शेती, चल अचल संपत्ती असल्याने व जन्मभूमीची ओढ असल्याने त्यांनी बावन बुर्जी करवंड येथे परत वास्तव्यास येण्याचे ठरविले व आज ते गावातच राहू लागले. हरिरुद्र प्रतापरुद्र इंगळे यांचा जन्म हा बावन बुर्जी करवंड गावातच झालेला असल्याने व विदर्भातून दक्षिण भारताच्या तंजावर ते उत्तर भारतच्या ग्वाल्हेर पर्यंत इंगळे अर्थात मराठा साम्राज्याचा विस्तार याविषयी खूप माहिती भेटली. कोणतेच महान कार्य हे एकट्याच्या भरवश्यावर होत नाही याची जाणीव होती, अरविंद बापू यांचे सातत्याने चालू असलेले प्रयत्न, मराठा समाजातील सुप्रसिद्ध व्यक्तिमत्व सुनील जवंजाळ पाटील यांनी गावातील इतिहासाचा विषय उचलून धरला इतकंच नव्हे तर सुनील जवंजाळ पाटील यांनी या विषयी जनजागृती व राजकीय मंडळीला महत्व निदर्शनात आणून दिले व या गावात एक आगळे वेगळे असे सोहळा साजरा करण्याचे ठरविले दोन तीन वर्षाने का होईना पण या स्वप्नातल्या कल्पनेला आलेला वेग पाहता खूप आनंद झाला.

छोट्याश्या बातमीतून आज आमचे गाव महाराष्ट्राच्या प्रत्येक कानाकोपऱ्यात झळकू लागले यासाठी निवडक एक दोन नव्हे तर प्रत्येक मराठी माणसाचे योगदान लाभले. छत्रपती शिवाजी महाराज यांचा ३७० वा विवाह स्मृती सोहळा आयोजित करण्यासाठी व त्याला पूर्णत्वास नेण्यासाठी चिखली विधानसभा मतदार संघाचे विद्यमान आमदार आदरणीय विदर्भकन्या सौ श्वेताताई महाले व भूमिपुत्र आदरणीय विद्याधरजी महाले साहेब यांनी सकारात्मक दृष्टिकोन ठेवत या उत्साहाला शासकीय सोहळ्याचे रूपच दिले नाही तर प्रशासनाला ताकीद देऊन पूर्णत्वास पण नेले. यासाठी जिल्हाधिकारी साहेब व उप विभागीय अधिकारी पाटील साहेब यांच्या मार्गदर्शनात विद्यमान तहसीलदार सवडे साहेब , नायब तहसीलदार गायकवाड साहेब, नायब तहसीलदार वीर साहेब, मंडळ अधिकारी सरागे साहेब,ग्राम महसूल अधिकारी शिवानंद वाघ साहेब ग्राम पंचायत ग्राम विकास अधिकारी हाके साहेब सह तालुक्यातील सर्वच अधिकारी कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेऊन हा सोहळा पूर्णत्वास नेऊन सफल केला. आमच्या जिल्ह्याचे अभिमान गौरव असलेले माननीय विद्याधरजी महाले साहेब आपण जे सहकार्य केले त्याबद्दल आपले मनः पूर्वक आभार मला तुम्हाला भेटण्याचा योग नाही आला परंतु आपण जे विकासात्मक दूरदृष्टी ठेवता त्याबद्दल मीच नव्हे जिल्हाभर सर्वश्रुत आहे. तुमच्या या अभूतपूर्व कार्याने परत सहकार्याची लालसा वाढली आहे. माझ्या गावाचा कायापालट करण्यासाठी जलपुरुष स्वर्गीय भारतभाऊ बोंद्रे यांनी मंजूर केलेला धरण परत या प्रकल्पाला नव्याने मंजूर करून द्या. गावाला लागून ज्ञानगंगा अभयारण्य आहे गावातून जर जंगलात जंगल सफारी व्यवस्था झाली गावाला पर्यटन क्षेत्र व ४ऐतिहासिक दर्जा मिळाला तर गावातील तरुणांना माझ्यासारखे गाव सोडून रोजगार साठी वणवण भटकावे लागणार नाही. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विवाह सोहळ्यात राजकीय मतभेद दूर ठेवून जिल्ह्यातील भूमिपुत्र नामदार प्रतापराव जाधव साहेब, आमदार धर्मवीर संजयजी गायकवाड साहेब, आमदार खरात साहेब, माजी आमदार शिवमती रेखाताई खेडेकर, मराठा सेवा संघाचे संस्थापक आदरणीय पुरुषोत्तम खेडकर साहेब व ईतर राजकीय मंडळीने तण मन धनाने सहकार्यच केले नाही तर सोहळ्याला उपस्थित राहून मोलाचे योगदान दिल्याबद्दल सर्वच गावकरी आपले ऋणी आहेत या कार्यक्रमाला उपस्थित प्रत्येक मान्यवरांचे शतशः आभार. राजकारणात थोडे फार मतभेद असतीलही पण बावन्न बुर्जी करवंड येथील या ऐतिहासिक सोहळ्यात मतभेद विसरून विदर्भ कन्या आमदार श्वेताताई महाले व धर्मवीर आमदार संजुभाऊ गायकवाड यांनी राजकारण सोडून समाजकारण करीत समाजहितासाठी जी दीप प्रज्वलन केले त्याबद्दल दोघांच्या मनातील मोठेपण समाजासाठी व विकासात्मक दृष्टिकोन विषयी एकमत दिसून आले. जिजाऊंची लेक आमदार सौ श्वेताताई महाले व छत्रपती शिवाजी महाराजांच्या आदर्शावर चालणारे धर्मवीर आमदार संजुभाऊ गायकवाड यांच्या हातून बावन्न बुर्जी करवंड गावाचा कायापालट होईल असे संकेत दिसून येत आहे.

लेखक
शेख मुख्तार..




The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



## विरोधकांच्या एकीने सरकारवर नामुष्की; भाजपची खेळी अपयशी

# विधेयक दोन तृतीयांश बहुमतापासून दूर

■ नवी दिल्ली/वृत्तसंस्था

विधानसभा, लोकसभेत महिलांना ३३ टक्के आरक्षण देण्याबरोबरच लोकसभा मतदारसंघांची वाढ करण्यासाठीचे घटनादुरुस्ती विधेयक शुक्रवारी लोकसभेत दोन तृतीयांश बहुमताअभावी फेटाळले गेले. मतदारसंघ फेररचनेच्या विरोधात ठाम भूमिका घेणाऱ्या 'इंडिया' आघाडीने शेवटपर्यंत एकजूट राखल्याने ही घटनादुरुस्ती प्रतिष्ठेची करणाऱ्या एनडीए सरकारवर पराभवाची नामुष्की ओढवली. मोदी सरकारच्या आजवरच्या कार्यकाळात विरोधामुळे नामंजूर झालेले हे पहिले विधेयक ठरले. त्याबरोबरच महिला आरक्षणाद्वारे पाच राज्यांच्या ऐन निवडणुकीदरम्यान राजकीय फायदा मिळवण्याच्या भाजपच्या प्रयत्नांवरही पाणी पडले.



लोकसभेच्या विशेष अधिवेशनात गुरुवारी आणि शुक्रवारी झालेल्या १८ ते २० तासांच्या चर्चेनंतर शुक्रवारी सायंकाळी साडेसातच्या सुमारात लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी घटनादुरुस्ती विधेयक मतदानाला टाकले. मात्र, विरोधी पक्षांच्या 'इंडिया' आघाडीने सुरुवातीपासून घेतलेली विरोधाची भूमिका कायम ठेवल्याने विधेयक सभागृहाच्या पटलावर नामंजूर होण्याची औपचारिकता उरली होती. सभागृहात एनडीएचे एकूण संख्याबळ २९८ इतके होते. बहुमतासाठी त्यांना ३५२ मतांची गरज होती. मात्र, तेवढी मिळू न शकल्याने विधेयक फेटाळले गेले.

हे विधेयक संमत झाले असते तर २०२९ च्या लोकसभा निवडणुकीत महिलांना ३३ टक्के आरक्षण मिळाले असते मात्र, विरोधकांच्या अडेलतट्टूपणामुळे महिला तिसऱ्यांदा आरक्षणापासून वंचित राहिल्या, असे खापर केंद्रीय संसदीय कामकाजमंत्री किरेन रिजिजू यांनी इंडिया आघाडीवर फोडले. महिलांच्या सशक्तीकरणासाठी एनडीए सरकार पुन्हा घटनादुरुस्ती विधेयक संसदेत मांडेल, अशी ग्वाहीही रिजिजू यांनी दिली. विरोधी पक्षांनी सरकारच्या या पराभवाबद्दल आनंद व्यक्त केला. मात्र महिला आरक्षणाला आपला पाठिंबा असल्याचा पुनरूच्चारही केला. ताज्या जनगणनेनुसार लोकसभा मतदारसंघांची फेररचना, दक्षिणेकडील राज्यांच्या जागांमधील संभाव्य घट, जातनिहाय आरक्षणाचा आग्रह या मुद्द्यांवर विरोधकांनी भूमिका कायम ठेवली आहे. 'काँग्रेस नेते राहुल गांधी आणि मल्लिकार्जुन खरगे यांनी समन्वयकाची भूमिका बजावल्याचे समजते. त्यांनी तृणमूल काँग्रेसच्या अभिषेक बॅनर्जी यांच्याशी चर्चा केली होती. गुरुवारी तृणमूल काँग्रेसचे काही खासदार गैरहजर होते पण, शुक्रवारी एखादा अपवाद वगळता इतर खासदार लोकसभेत उपस्थित होते. 'प्रत्यक्ष मतदानाआधी मते टाकताना आपल्या सदस्यांनी कोणतीही तांत्रिक चूक करून नये याची दक्षता काँग्रेसचे के. सुरेश, मणिकम टागोर, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या सुप्रिया सुळे, तृणमूल काँग्रेसच्या गटनेत्या शताब्दी रॉय, महुआ मोईत्रा घेताना दिसल्या. महिला आरक्षण घटनादुरुस्ती विधेयक लोकसभेत नामंजूर झाल्यानंतर भाजपच्या महिला खासदारांनी संसद भवन परिसरात घोषणाबाजी करत आंदोलन केले. भाजपने देशव्यापी आंदोलनाचीही घोषणा केली आहे. 'घटनादुरुस्ती विधेयकावरील मतदानावेळी विरोधकांच्या इंडिया आघाडीतील सर्व घटक पक्षांनी विरोधामध्ये मतदान केले. 'कोणताही पक्ष गैरहजर राहिला नाही वा मतदानापासून अलिप्त राहिला नाही. त्यातूनच विरोधकांची एकजूट स्पष्ट झाली.

### राज्यसभेत पंतप्रधानांचे आवाहन



पंतप्रधान नरेंद्र मोदींनी सर्वपक्षीय खासदारांना अंतरात्माचा आवाज ऐकण्याचे आवाहन केले. राज्यसभेमध्ये हरिवंश यांची बिनविरोध उपसभापती निवड करण्यात आली. त्यांचे अभिनंदन करताना शुक्रवारी मोदींनी राज्यसभेत भाषण करताना महिलांना आरक्षण देण्यासाठी खासदारांनी घटनादुरुस्ती विधेयक संमत करण्याची विनंती केली. मोदींच्या राज्यसभेतील सर्वपक्षीय आवाहनानंतर घटनादुरुस्ती व विधेयक फोल ठरण्याचे स्पष्ट झाले. ह्गेल्या चार दशकांपासून महिला आरक्षणाच्या मुद्द्यावरून देशाचे राजकारण केले जात आहे. आता देशाच्या निम्म्या लोकसंख्येला त्यांचे हक्क मिळतील याची खात्री करण्याची वेळ आली आहे. स्वातंत्र्याच्या इतक्या दशकांनंतरही, निर्णय प्रक्रियेत भारतीय महिलांचे प्रतिनिधित्व इतके कमी असणे योग्य नाही. लोकसभेत मतदान होणार आहे. मी सर्व राजकीय पक्षांना विनंती करतो... आवाहन करतो... कृपया काळजीपूर्वक विचार करा आणि अत्यंत संवेदनशीलतेने निर्णय घ्या, आणि महिला आरक्षणाच्या बाजूने मतदान करा, असे आवाहन मोदींनी केले.

### अधिसूचनेआधीच दुरुस्ती...

घटनादुरुस्ती विधेयक सखोल अभ्यास न करता मांडल्याचे केंद्र सरकारच्या कृतीमुळेच उघड झाले. २०२३ मध्ये संमत झालेला महिलांना ३३ टक्के आरक्षण देणारा नारीशक्ती वंदन कायदा अधिसूचितच केलेला नव्हता. जो कायदा अमलात आलेलाच नाही त्यामध्ये घटनादुरुस्तीद्वारे दुरुस्ती करणे संविधानबाह्य ठरले असते. ही चूक सुधारत गुरुवारी रात्री २०२३ चा कायदा अधिसूचित करण्यात आला. हा कायदा १६ एप्रिल २०२६ रोजी लागू झाला आहे, असे अधिसूचित केले गेले. 'सभागृहात दुसऱ्या एखाद्या विधेयकाच्या मंजुरीवर अवलंबून असलेले एखादे विधेयक मंजूर होऊ शकले नाही, तर मूळ विधेयक किंवा कायदाही निष्फळ ठरतो,' याकडे काँग्रेसचे खासदार मनिष तिवारी यांनी लक्ष वेधले.

---

## मतविभागणीवेळी विरोधकांच्या मतांमध्ये फूट पडण्यात अपयश

### अपयशाच्या स्पष्टतेनंतरही सरकारचे प्रयत्न..

■ नवी दिल्ली, वृत्तसंस्था :

केंद्र सरकारने महिला आरक्षणाशी लोकसभा मतदारसंघांच्या फेररचनेचे घटनादुरुस्ती विधेयक, मतदारसंघांची फेररचना व केंद्रशासित प्रदेशामध्ये कायदा लागू करणारे विधेयक अशी तीन विधेयके मांडली. मात्र, ही विधेयके मंजूर करण्यासाठी सत्ताधारी 'एनडीए' आघाडी विरोधकांमध्ये फूट पाडण्यात फोल ठरल्याचे शुक्रवारी सकाळीच स्पष्ट झाले. त्यानंतरही सरकारने विधेयके मागे घेण्याऐवजी त्यावर मतविभाजन घडवून आणल्याबद्दल आश्चर्य व्यक्त होत आहे.

सभागृहात गुरुवारी इंडिया आघाडीतील काँग्रेस, तृणमलू काँग्रेस, द्रमुक, समाजवादी पक्ष, शिवसेना ठाकरे गट, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष या प्रमुख पक्षांच्या खासदारांनी व त्यांच्या गटनेत्यांनी घटनादुरुस्तीला तीव्र विरोध केला होता. 'इंडिया' आघाडीतील नेत्यांनी घटनादुरुस्तीच्या विधेयकाविरोधातच मतदान केले जाईल, कोणताही पक्ष गैरहजर राहणार नाही वा मतदानावेळी सभात्यागही करणार नाही, असे खासगीत स्पष्ट केले होते. त्यामुळे शुक्रवारी मतविभागणीवेळी विरोधकांच्या मतांमध्ये फूट पडण्याची शक्यता संपुष्टात आली होती. लोकसभेमध्ये दोन दिवस झालेल्या



चर्चेला केंद्रीय गृहमंत्री अमित शहांनी उत्तर दिले. त्यानंतर मतविभागणीची घोषणा केली. प्रत्यक्ष मतदानाआधी मते टाकताना आपल्या सदस्यांनी कोणतीही तांत्रिक चूक करून नये याची दक्षता काँग्रेसचे के. सुरेश, मणिकम टागोर, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या सुप्रिया सुळे, तृणमूल काँग्रेसच्या गटनेत्या शताब्दी रॉय, महुआ मोईत्रा घेताना दिसल्या. हे सर्व नेते सदस्यांना मतदानावेळी 'नो'चे बटन दाबायचे आहे, चूक करू नका, असे सांगत होते. 'इंडिया' आघाडीच्या नेत्यांमध्ये कधी नव्हे इतकी एकजूट आणि संवाद पाहायला मिळत होता.

लोकसभेमध्ये घटनादुरुस्ती विधेयक संमत होण्याची शक्यता नसल्याचे दुपारी १२ वाजेपर्यंत स्पष्ट झाले होते. त्यामुळे सभागृहात नेमकी भूमिका काय घ्यायची, याबाबत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या संसदेतील दालनामध्ये बैठकाचे सत्र सुरू होते.

## मिशन कर्मयोगी अंतर्गत महाराष्ट्र 'टॉप परफॉर्मिंग स्टेट' म्हणून सन्मानित

■ नवी दिल्ली/वृत्तसंस्था

केंद्र सरकारच्या महत्त्वाकांक्षी 'मिशन कर्मयोगी' उपक्रमांतर्गत महाराष्ट्र राज्याने प्रशासकीय प्रशिक्षणात ऐतिहासिक कामगिरी नोंदवली आहे. साधना सप्ताह २०२६ निमित्त आयोजित विशेष सोहळ्यात महाराष्ट्राला 'टॉप परफॉर्मिंग स्टेट' (उत्कृष्ट कामगिरी करणारे राज्य) या बहुमानाने सन्मानित करण्यात आले. कार्मिक, सार्वजनिक तक्रार आणि पेन्शन मंत्रालयाचे राज्यमंत्री डॉ. जितेंद्र सिंह यांच्या हस्ते हा पुरस्कार सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव व्ही. राधा यांना प्रदान करण्यात आला.

नवी दिल्लीतील विज्ञान भवन येथे आयोजित सोहळ्यात, पंतप्रधान कार्यालयाचे राज्यमंत्री तथा कार्मिक, सार्वजनिक तक्रार आणि पेन्शन मंत्रालयाचे राज्यमंत्री डॉ. जितेंद्र सिंह यांच्या हस्ते साधना सप्ताह 2026 मध्ये उत्कृष्ट कामगिरी करणारे मंत्रालय, विभाग आणि राज्यांचा सन्मान करण्यात आला. याच सोहळ्यात महाराष्ट्रातील 'यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी' (यशदा) या संस्थेला 'स्पेशल अवॉर्ड' देऊन गौरविण्यात आले. ई-लर्निंग आणि प्रशासकीय प्रशिक्षणासाठी ओळखल्या जाणाऱ्या 'यशदा'ने आयजीओटी प्लॅटफॉर्मचा प्रभावी वापर करून अधिकाऱ्यांना डिजिटल कौशल्यांत सक्षम केल्याबद्दल हा राष्ट्रीय सन्मान प्रदान करण्यात आला.

क्षमता विकास आयोग आणि 'कर्मयोगी भारत' यांच्या संयुक्त विद्यमाने २ ते ८ एप्रिल २०२६ दरम्यान 'साधना सप्ताह' साजरा करण्यात आला. 'तंत्रज्ञान, परंपरा आणि मूर्त परिणाम' ही यामागची संकल्पना होती. 47 लाख शासकीय कर्मचारी साधना सप्ताहमध्ये सहभागी झालें होते. 33 लाखाहून अधिक कर्मचाऱ्यांनी विहित केलेले चार तासांचे




प्रशिक्षण पूर्ण केले आहे.

महाराष्ट्रातील तब्बल 5 लाखांहून अधिक शासकीय कर्मचाऱ्यांनी 'आयजीओटी' या डिजिटल प्लॅटफॉर्मवर प्रत्येकी किमान 4 तासांचे प्रशिक्षण यशस्वीपणे पूर्ण केले. राज्याच्या या समर्पित प्रयत्नांची दखल घेत राष्ट्रीय स्तरावर महाराष्ट्राची विशेष श्रेणीत निवड करण्यात आली.

महाराष्ट्राच्या प्रशासकीय शिस्तीचे आणि कर्मचाऱ्यांच्या कौशल्यावर आधारित प्रतिसादाचे विशेष कौतुक मंत्री डॉ. जितेंद्र सिंह यांनी केले. तसेच त्यांनी साधना सप्ताह 2026 मधील सहभाग हा केवळ तांत्रिक नसून तो शासकीय यंत्रणेतील एका मोठ्या वर्तणूक बदलाचे प्रतिबिंब असल्याचे सांगितले. यामुळे प्रशासकीय क्षमता बांधणी ही केवळ श्रेणीबद्ध रचनेपुरती मर्यादित न राहता, ती थेट सामान्य नागरिकांना मिळणाऱ्या सेवांमध्ये सुधारणा घडवून आणणारी ठरेल. तंत्रज्ञानाच्या युगात आर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि डिजिटल साधनांचा वापर करून कर्मचारी स्वतःला अपडेट करत आहेत, ही समाधानाची बाब असल्याचेही त्यांनी सांगितले.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



## अर्धवट शिजलेल्या मटणाने हिरावला संसाराचा घास

# पतीने केला अपमान, पत्नीने उचलले टोकाचे पाऊल

यवतमाळ, वृत्तसंस्था :

एकीकडे पाहुणचाराचा थाट आणि दुसरीकडे संशयाचे काळेकुट्ट जाळे... या विसंगतीत एका निष्पाप गृहिणीचा बळी गेला आहे. केवळ 'मटण नीट शिजले नाही' या शुल्लक कारणावरून झालेल्या वादाने आर्णी तालुक्यातील बोरगाव येथे एका हसत्याखेळत्या संसाराची राखरांगोळी झाली. मित्रासमोर पतीने केलेला अपमान सहन न होऊन पत्नीने विष प्राशन करून आत्महत्या केली. चेतना मनोज जाधव (३३) असे मृत महिलेचे नाव आहे.

बुधवारची रात्र चेतना जाधव हिच्यासाठी शेवटची ठरेल, असे कोणालाही वाटले नव्हते. चेतनाचा पती मनोज जाधव याने एका मित्राला जेवणासाठी घरी बोलावले होते. 'मटणाची भाजी बेतशीर आणि चांगली कर,' अशी सूचना त्याने पत्नीला दिली होती. अंगणात जेवणाचा बेत रंगला होता, पण पाहुण्यासमोरच मनोजचा पारा चढला. मटण व्यवस्थित



शिजले नसल्याच्या कारणावरून त्याने पत्नीशी जोरदार वाद घालण्यास सुरुवात केली. हा वाद केवळ स्वयंपाकापुरता मर्यादित राहिला नाही, तर त्यात मनोजच्या जुन्या संशयी स्वभावाचा आणि व्यसनाचा तडका लागला.

**मुलं पोरकी झाली...**
चेतना आणि मनोज यांच्या यांच्या संसारवेलीवर मुलगा लेख आणि मुलगी अन्वी अशी दोन मुले आहेत. मात्र वडिलांच्या तापट स्वभावाने दोन्ही मुले आईच्या प्रेमास पोरकी झाली आहे. ज्या बापाने घराचे रक्षण करायचे, त्याच बापाच्या संतापाने या मुलांच्या आयुष्यात कायमचा अंधार पसरवला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मनोज हा दारूच्या आहारी गेला होता. यापूर्वीही २०१५ मध्ये त्याच्यावर कौटुंबिक छळाचा गुन्हा दाखल झाला होता. २०१७ मध्ये 'पुन्हा सुखाने संसार करू' या अटीवर चेतनाने त्याला माफ केले होते. मात्र, बुधवारी झालेल्या अपमानाचा घाव चेतना हिच्या मनाला इतका खोल लागला की, तिने टोकाचे पाऊल उचलले. भरल्या ताटावरून उठून ती आत गेली आणि तिने विषारी औषध प्राशन केले. बाहेर येऊन जेव्हा तिने पतीला ही बाब सांगितली, तेव्हा एकच खळबळ उडाली. तिला तातडीने आर्णी येथील ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आले, पण नियतीला काही वेगळेच मान्य होते; डॉक्टरांनी तपासून तिला मृत घोषित केले.

**पतीस अटक..** चेतनाचे मामा मनोहर राठोड, रा. देवगाव यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी चेतनाचा पती मनोज जाधव याच्यावर आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हा नोंद करून त्यास अटक केली. चेतनाच्या मृत्यूनंतर आर्णी ग्रामीण रुग्णालयात नातेवाईकांनी केलेली गर्दी आणि त्यांचा आक्रोश काळजाला पिळवटून टाकणारा होता. आता सर्वांचे लक्ष शवविच्छेदन अहवालाकडे लागले असून, पोलीस उपनिरीक्षक पल्लवी निनगूरकर या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

## शिरोड्यात ७ कोटींच्या 'अंबरग्रीस'सह चौघे जेरबंद; वनविभागाची कारवाई

सावंतवाडी/वृत्तसंस्था

सिंधुदुर्ग जिल्हातील शिरोड्यात आंतरराष्ट्रीय बाजारात मोठी किंमत असलेल्या 'अंबरग्रीस'ची (ब्लू व्हेल माशाची उलटी) तस्करी करणाऱ्या टोळीला वनविभागाने १६ एप्रिल रोजी सायंकाळी सापळा रचून जेरबंद केले. या कारवाईत ९.१२० किलो वजनाचे अंबरग्रीस जप्त करण्यात आले असून, त्याची बाजारभावाप्रमाणे किंमत ७ कोटी रुपये आहे.

शिरोडा परिसरात काही जण बेकायदेशीररीत्या अंबरग्रीसची विक्री करणार असल्याची गोपनीय माहिती वनक्षेत्रपाल सचिन शिदतुरे यांना मिळाली होती. त्यानुसार, उपवनसंरक्षक मिलीश शर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली वनविभागाच्या पथकाने बनावट ग्राहक तयार करून संशयितांना गाठले. शिरोड्यातील परबगाव येथे रचलेल्या सापळ्यात हे चौघे जण मुद्देमालासह अडकले. या प्रकरणी संशयित रणजित रामचंद्र नायर रा. परबगाव, गुरुनाथ नाईक रा. परबगाव, विभव



आडारकर रा. शिरोडा,निलेश मनोहर पांडजी रा. रेडी यांना ताब्यात घेऊन अटकेची कारवाई करण्यात आली आहे.

ब्ल्यू व्हेल हा वन्यजीव संरक्षण कायद्यानुसार 'अनुसूची-१' मधील संरक्षित प्राणी आहे. त्याच्या उपपदार्थांची विक्री करणे हा गंभीर गुन्हा आहे . या प्रकरणी सावंतवाडी वनक्षेत्रपाल फिरते पथक अधिक तपास करत आहे. अशा प्रकारच्या तस्करीची माहिती मिळाल्यास नागरिकांनी तात्काळ वनविभागाला कळवावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## वाहतूक पोलिसालाच मागितली खंडणी

पिंपरी : वाहतूक नियमांचे उल्लंघन केल्याबद्दल दंड भरतानाचे चित्रीकरण करून ते व्हायरल करण्याची धमकी देत एका पोलीस कर्मचाऱ्याकडे ५० हजार रुपयांच्या खंडणीची मागणी करण्यात आली. ही घटना बुधवारी (१५ एप्रिल) सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास भुजबळ चौक येथील वाकड वाहतूक शाखेमध्ये घडली.

या प्रकरणात पोलीस कॉन्स्टेबलने वाकड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार वरद मनोज चव्हाण (विद्युत कॉलनी, कन्नड, संभाजीनगर) याला अटक केली असून त्याच्या दोन साथीदारांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी पोलीस कॉन्स्टेबल हे वाकड वाहतूक विभागात कार्यरत आहेत. आरोपी वरद चव्हाण याच्या दुचाकीवर १३ हजार रुपयांचा दंड प्रलंबित होता. वाहतूक पोलिसांनी त्याची दुचाकी पकडली. दंड खूप असल्याने त्यातील किमान एक हजार रुपये तरी दंड भरावा असे आरोपी वरद याला सांगण्यात आले. एक हजार रुपये दंड भरताना आरोपींनी वाहतूक पोलीस यांचे व्हिडिओ चित्रीकरण केले.

## अमली पदार्थ विकणाऱ्या टोळीवर मकोका

पिंपरी/वृत्तसंस्था

शहरात अमली पदार्थांची अवैध विक्री करणाऱ्या एका संघटित टोळीवर महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम (मकोका) अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. अमली पदार्थ विकणाऱ्या टोळीवर २०२६ मधील 'मकोका'ची पहिली कारवाई असल्याचे पोलिसांनी सांगितले.

टोळीप्रमुख मेहबूब कमरुद्दीन करपुडे उर्फ मुसा खान (वय ३२, हडपसर), प्रतीक सचिन सपकाळ (वय २८, खडकी), अमीन फिरोज खान (वय २३, घोरपडी पेठ), रफीक अबुबखर मेमन (वय ६२, कोंढवा, पुणे) आणि वसीम इसाक बेग (वय ३७, धाराशिव) अशी कारवाई झालेल्या आरोपींची नावे आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सांगवी पोलीस ठाण्याच्या हद्दीत १२ डिसेंबर २०२५ रोजी दोघांना अमली पदार्थांची विक्री करताना रंगेहाथ पकडले होते. त्यांच्याकडे ५५ ग्रॅम २१ मिली ग्रॅम 'एमडी' हा अमली पदार्थ सापडला होता. आरोपी एका संघटित टोळीच्या माध्यमातून हा व्यवसाय करीत होते. पोलिसांनी या कारवाईत 'एमडी'सह मोबाइल फोन आणि




एक चारचाकी वाहन असा एकूण आठ लाख ६९ हजार ९०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला. आरोपींवर यापूर्वीही अनेक गुन्हे दाखल असल्याचे तपासात समोर आले आहे. अमली पदार्थविरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक महेश पाटील यांनी या टोळीवर 'मकोका' लावण्याचा प्रस्ताव सादर केला होता. त्याला अपर पोलीस आयुक्त सारंग आव्हाड यांनी मंजुरी दिली आहे.

ही कारवाई वरिष्ठ पोलीस निरीक्षक महेश पाटील, सहायक पोलीस निरीक्षक विक्रम गायकवाड, श्रेणी उपनिरीक्षक स्वामीनाथ जाधव, पोलीस कॉन्स्टेबल निखिल शेटे, गणेश करपे, जावेद बागसिराज, किशोर परदेशी, सदानंद रुद्राक्षे, गोविंद डोके, रणवीर माने यांच्या पथकाने केली आहे.

# छाप्यात पुराव्यांचा ढिगारा; भोंदूबाबा अशोक खरातचे कार्यालय सील!

नाशिक/वृत्तसंस्था

महिला लैंगिक शोषण प्रकरणी पोलीस कोठडीत असणाऱ्या भोंदूबाबा अशोक खरातच्या आलिशान बंगल्याची मध्यंतरी झाडाझडती घेतल्यानंतर, शुक्रवारी सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) त्याच्या कॅनडा कॉर्नर भागातील 'ओकस प्रॉपर्टीज' कार्यालयात सहा ते सात तास पडताळणी केली. येथून मालमत्तेशी संबंधित अनेक महत्त्वाचे दस्तावेज जप्त केले. या कारवाईबद्दल पथकाने कुठलीही माहिती देण्यास नकार दिला.

भोंदूबाबा खरातचे आर्थिक व्यवहार आणि कोट्यवधींच्या मालमत्तेची सक्तवसुली संचालनालयाकडून चौकशी प्रगतीपथावर आहे. महिला लैंगिक शोषण प्रकरणी अटक झाल्यानंतर त्याची डोळे दीपवणारी संपत्ती समोर आली होती. महिला लैंगिक शोषण प्रकरणाचा तपास करणाऱ्या एसआयटीने मालमत्तेशी संबंधित दस्तावेज, बँक खात्यांचे तपशील आणि अन्य आर्थिक बाबींची माहिती पूर्वीच सक्तवसुली संचालनालयाकडे (ईडी) दिली आहे. त्या अंतर्गत ईडीने खरातच्या घर, कार्यालय व इतर मालमत्तांवर छापे टाकून छाननी सुरू केली.




गेल्या सोमवारी ईडीच्या पथकाने कर्मयोगीनगर येथील खरातच्या 'तृप्तबाला' बंगल्यावर छापा टाकून दिवसभर छाननी केली होती. खरातने भोंदूगिरीतून मोठी माया जमवली. अनेक देशांमध्ये भ्रमंती केली. देशांतर्गत तो अनेकदा खासगी विमानाने प्रवास करीत होता. इतकेच नव्हे तर, खरातने भक्तांकडून त्यांच्यासह कुटुंबीयांचे आधार कार्ड, छायाचित्र व अन्य कागदपत्रे घेतली होती. याचा वापर त्यांना अंधारात ठेवून अहिल्यानगर येथील पतसंस्थांमध्ये खाती उघडण्यासाठी केल्याचे समोर आले. या सर्व खात्यांचे वारसदार अर्थात 'नॉमिनी' म्हणून त्याने स्वतःचे नाव ठेवले होते. पतसंस्थेतील या खात्यांमधून कोट्यवधींचे व्यवहार झाले. या सर्वांची ईडीकडून छाननी केली जात आहे. खरात व कुटुंबीयांच्या नावे नाशिक शहरासह सिन्नर, अहिल्यानगरमधील शिर्डी, राहता, निघोज, निमगाव कोऱ्हाळे आदी ठिकाणी शेकडो कोटींचे भूखंड आणि शेतजमिनी आहेत. शुक्रवारी सकाळी ईडीचे पथक खरातच्या कॅनडा कॉर्नर भागातील कार्यालयात पोहोचले. सहा ते सात तास कार्यालयाची झाडाझडती घेण्यात आली. खरातचे आर्थिक व्यवहार व मालमत्तेशी संबंधित महत्त्वपूर्ण दस्तावेज जप्त करण्यात आले. दुपारी तीन वाजता पथक कार्यालय सील करून रवाना झाले. या छाप्यात कोणती कागदपत्रे पथकाच्या हाती लागली याची स्पष्टता झाली नाही. ईडीकडून कागदपत्रांची युद्धपातळीवर जमवाजमव सुरू झाल्यामुळे भोंदूबाबाशी आर्थिक हितसंबंध ठेवणारे चौकशीच्या फेऱ्यात येण्याचा अंदाज वर्तविला जात आहे. महिला लैंगिक शोषण प्रकरणी चौथ्या गुन्ह्यात भोंदूबाबा अशोक खरातची न्यायालयाने १८ एप्रिलपर्यंत पोलीस कोठडीत रवानगी केली होती. या पोलीस कोठडीची मुदत शनिवारी संपुष्टात येत असून एसआयटीमार्फत त्याला न्यायालयात हजर केले जाणार आहे.

# लागोपाठ 5 सामने गमावले, पण KKR कडे अजूनही प्लेऑफ गाठण्याची संधी!

■ मुंबई, वृत्तसंस्था :

आयपीएल २०२६ स्पर्धेतील २५ वा सामना कोलकाता नाईट रायडर्स आणि गुजरात टायटन्स या दोन्ही संघांमध्ये पार पडला. शेवटच्या षटकापर्यंत गेलेल्या या सामन्यात कोलकाता नाईट रायडर्स संघासाठी विजयाची संधी निर्माण झाली होती. पण शेवटी गुजरात टायटन्सने हा सामना ५ गडी राखून आपल्या नावावर केला आणि गुणतालिकेत झेप घेतली. तर दुसरीकडे कोलकाता नाईट रायडर्सचा संघ अजूनही आपल्या पहिल्या विजयाच्या प्रतीक्षेत आहे. या सामन्यातील पहिल्या डावात फलंदाजी करताना कोलकाता नाईट रायडर्सचा डाव १८० धावांवर आटोपला. १८१ धावांचा पाठलाग करताना कर्णधार गिलने दमदार अर्धशतकी खेळी केली आणि गुजरातचा विजय निश्चित केला. हा कोलकाताचा सलग पाचवा पराभव ठरला. पण कोलकाताचा संघ अजूनही स्पर्धेतून बाहेर झालेला नाही. प्लेऑफमध्ये जाण्यासाठी कसं असेल कोलकाता नाईट रायडर्स संघासाठी समीकरण? जाणून घ्या.



हा सामना गमावताच कोलकाता नाईट रायडर्स संघाच्या नावे नकोसा रेकॉर्ड नोंदवला गेला आहे. कोलकाताचा संघ पाचवा असा संघ ठरला आहे, ज्या संघाने लागोपाठ ६ सामन्यांमध्ये एकही विजय मिळवलेला नाही. आतापर्यंत जितक्या वेळेस असं झालं आहे, त्यावेळी ते संघ गुणतालिकेत तळाशी राहिले आहेत. पण क्रिकेटमध्ये कधीही काहीही होऊ शकतं. त्यामुळे कोलकाता नाईट रायडर्स संघाच्या प्लेऑफमध्ये प्रवेश करण्याच्या आशा अजूनही कायम आहेत.

**कोलकाता नाईट रायडर्स संघासाठी कसं असेल समीकरण?**

कोलकाताने आतापर्यंत ६ सामना खेळले असून ५ सामने गमावले आहेत. १ सामना पावसामुळे रद्द झाला होता. त्यामुळे कोलकाताचा संघ गुणतालिकेत सर्वात शेवटी आहे. अजूनही ८ सामने शिल्लक आहेत. हे सर्व सामने जिंकले तर कोलकाताचा संघ प्लेऑफसाठी पात्र ठरू शकतो. जर सर्व ८ सामने जिंकले, तर हा संघ १७ गुणांपर्यंत पोहोचू शकतो आणि १७ गुणांसह प्लेऑफ गाठणं शक्य आहे. पण यापैकी एकही सामना गमावला तर कोलकाताच्या अडचणीत वाढ होऊ शकते. असं झाल्यास कोलकाताची गाडी १५ गुणांवर थांबेल. गेल्या हंगामात दिल्लीने देखील १५ गुणांची कमाई केली होती. पण हा संघ प्लेऑफमध्ये प्रवेश करू शकला नव्हता. त्यामुळे कोलकाता नाईट रायडर्स संघाला जर प्लेऑफमध्ये प्रवेश करायचा असेल, तर प्रत्येक सामना हा नॉकआऊट सामन्यासारखाच खेळावा लागणार आहे.

## ट्रीसा-गायत्री जोडीची उबर चषक स्पर्धेतून माघार; बॅडमिंटन संघाच्या तयारीला धक्का

■ नवी दिल्ली/वृत्तसंस्था



बॅडमिंटनमधील भारताची आघाडीची जोडी असलेल्या ट्रीसा जॉली आणि गायत्री गोपीचंद यांनी आगामी 'उबर चषक फायनल्स' स्पर्धेतून माघार घेतली आहे. ट्रीसाला घोट्याची दुखापत झाल्यामुळे हा निर्णय भारतीय जोडीला घ्यावा लागला. यामुळे डेन्मार्क येथे होणाऱ्या या स्पर्धेपूर्वीच भारताला मोठा धक्का बसला आहे.

डेन्मार्कच्या हॉर्सन्स येथे २४ एप्रिल ते ३ मे या कालावधीत 'थॉमस आणि उबर चषक फायनल्स' स्पर्धा होणार आहे. भारतीय पुरुष आणि महिला संघ 'अ' गटात आहेत. यापूर्वी २०२२ मध्ये ऐतिहासिक विजेतेपद पटकावणाऱ्या पुरुष संघाचा गतविजेत्या चीन, कॅनडा आणि ऑस्ट्रेलियासह एकाच गटात समावेश आहे. भारतीय महिला संघाचा सामना १६ वेळा विजेतेपद मिळवणाऱ्या चीनसह यजमान डेन्मार्क आणि युक्रेनशी होईल.


"आशिया अजिंक्यपद स्पर्धेला रवाना होण्याच्या अवघ्या २-३ दिवस आधी दुर्दैवाने ट्रीसाचा पाय मुरगळला. सराव करताना तिचा पाय तिच्या जोडीदाराच्या पायावर पडला आणि हा अपघात झाला," असे भारतीय संघाचा दुहेरीचा प्रशिक्षक बी. सुमीत रेड्डीने सांगितले. ट्रीसा सध्या विश्रांती घेत असून लवकरच पुनर्वसन प्रक्रियेतून जाईल. ही दुखापत फार गंभीर नाही आणि ती सुमारे चार आठवड्यांत बरी होईल. मे महिन्याच्या अखेरीस होणाऱ्या सिंगापूर खुल्या स्पर्धेतून ती पुनरागमन करू शकेल अशी अपेक्षाही प्रशिक्षक रेड्डी यांनी व्यक्त केली. ट्रीसाच्या खांद्याच्या समस्येमुळे या आघाडीच्या जोडीला गेल्या महिन्यात झालेल्या स्विस खुल्या स्पर्धेतूनही माघार घ्यावी लागली होती. आता भारतीय बॅडमिंटन महासंघाने उबर चषकासाठी ट्रीसा-गायत्रीच्या अनुपस्थितीत श्रुती मिश्रा आणि प्रिया कोंजेंगबाम यांची दुहेरीतील बदली खेळाडू म्हणून निवड केली आहे. श्रुती आणि प्रिया या २०२३च्या राष्ट्रीय स्पर्धेतील विजेत्या असून सध्या जागतिक क्रमवारीत ४८व्या स्थानावर आहेत.

## अवघड निर्णय घेण्याची वेळ? चौथ्या पराभवानंतर मुंबईचा कर्णधार पंड्याचे संकेत

■ मुंबई/वृत्तसंस्था

इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) ट्वेन्टी-२० क्रिकेटच्या हंगामातील सलग चौथ्या पराभवानंतर मुंबई इंडियन्सचा कर्णधार हार्दिक पंड्याने संघाच्या कामगिरीवर स्पष्ट शब्दांत नाराजी व्यक्त करताना आता काही अवघड निर्णय घेण्याबाबत विचार करण्याची वेळ आल्याचे म्हटले आहे. तसेच मुंबई संघाला विजयपथावर आणायचे झाल्यास प्रत्येक खेळाडूने जबाबदारी स्वीकारायला हवी, असेही त्याने स्पष्ट केले.

पाच वेळच्या विजेत्या मुंबई संघाने यंदाच्या 'आयपीएल' हंगामाची विजयासह सुरुवात केली होती. मात्र, त्यानंतर मुंबईला सलग चार सामन्यांत हार पत्करावी लागली आहे. गुरुवारी घरच्या मैदानावर अर्थात वानखेडे स्टेडियम येथे झालेल्या सामन्यात मुंबई संघाला पंजाब किंग्जकडून पराभव पत्करावा



लागला. फलंदाज क्विंटन डिकॉक आणि नमन धीर, तर गोलंदाजीत अल्ला घझनफरचा अपवाद वगळता मुंबईच्या सर्वच खेळाडूंनी निराशाजनक कामगिरी केली. त्यामुळे मुंबईचा संघ गुणतालिकेत केवळ दोन गुणांसह नवव्या स्थानावर घसरला आहे. "प्रामाणिकपणे सांगायचे तर आत्ता माझ्याकडे जास्त काही सांगण्यासारखे नाही. आम्हाला बहुधा पुन्हा सुरुवातीपासून विचार करण्याची गरज आहे. आम्ही व्यक्तिगत पातळीवर कमी पडत आहोत की संघ म्हणून आमच्या नियोजनात कमतरता आहे, हे तपासून आम्हाला पुढचे पाऊल ठरवावे लागेल," असे हार्दिक सामन्यानंतर म्हणाला.

## सिंदारोवने गुकेशला नमवल्यास कार्लसनच्या पुनरागमनाची शक्यता; जगज्जेतेपदाच्या लढतीबाबत कास्पारोवचे मत

■ सेंट लुइस/वृत्तसंस्था

जावोखिर सिंदारोवने 'कँडिडेट्स' स्पर्धेत उत्कृष्ट खेळ केला. सध्याच्या घडीला तो जगज्जेत्या दोम्माराजू गुकेशपेक्षा अधिक प्रभावी दिसत आहे. त्यामुळे आगामी जागतिक अजिंक्यपद बुद्धिबळ लढतीत सिंदारोवने गुकेशला पराभूत केल्यास आश्चर्य वाटणार नाही आणि तसे झाल्यास मॅग्नस कार्लसन जगज्जेतेपदासाठी पुन्हा आव्हान उपस्थित करण्याचीही शक्यता नाकारता येणार नाही, असे मत दिग्गज बुद्धिबळपटू गॅरी कास्पारोव यांनी व्यक्त केले.

सायप्रस येथे नुकत्याच झालेल्या 'कँडिडेट्स' स्पर्धेत सिंदारोवने प्रतिस्पर्ध्यांवर वर्चस्व गाजवले. त्याने एकही सामना न गमावता या स्पर्धेचे विजेतेपद पटकावले आणि जगज्जेतेपदासाठी गुकेशला आव्हान देण्याची संधी मिळवली.

"सिंदारोवने ज्या पद्धतीने 'कँडिडेट्स' स्पर्धा जिंकली, ते अत्यंत प्रभावी होते. मी सहजासहजी प्रभावित होत नाही, पण त्याच्या खेळातील अचूकता, चालींची गुणवत्ता, दडपण सहन करण्याची आणि प्रतिस्पर्ध्यावर उलट दडपण निर्माण करण्याची क्षमता विलक्षण आहे. गुकेश गेल्या काही काळापासून संघर्ष करत आहे. त्यामुळे सध्याच्या कामगिरीचा विचार करता जागतिक अजिंक्यपदाच्या लढतीत सिंदारोवचे पारडे जड वाटते," असे सेंट लुइस चेस क्लबच्या यूट्यूब वाहिनीला दिलेल्या मुलाखतीत कास्पारोव यांनी नमूद केले.



सिंदारोव सर्वोच्च स्तरावर अजून नवखा आहे, पण तो खूप वेगाने प्रगती करत आहे. गुकेशने आधीच अनेक मोठ्या स्पर्धांमध्ये भाग घेतला आहे. सिंदारोवचा उदय अधिक वेगाने झाल्यासारखा वाटतो. गुकेश अत्यंत लढवय्या आहे. कोणतीही स्थिती असो, तो बचाव करत राहतो आणि शेवटच्या क्षणापर्यंत संधी शोधतो. त्याला जगज्जेतेपदाचा अनुभव आहे, तर सिंदारोव प्रथमच इतकी मोठी लढत खेळणार आहे. त्यामुळे काहीही होऊ शकते.

'जगज्जेतेपदाची लढत अतिशय रंजक ठरेल यात शंका नाही. सध्याचा विश्वविजेता १९ वर्षांचा, तर आव्हानवीर २० वर्षांचा आहे. मात्र, बुद्धिबळातील सर्वांत बलाढ्य खेळाडू अजूनही ३५ वर्षीय कार्लसनच आहे. सिंदारोवने गुकेशला पराभूत केल्यास, कार्लसनला पुन्हा जगज्जेतेपदासाठी लढण्याची प्रेरणा मिळू शकते. मला सिंदारोव-कार्लसन सामना पाहायला आवडेल," असे कास्पारोव म्हणाले.

# अपूर्वा नेमळेकरने शेअर केला श्रद्धा कपूरचा फोटो; चाहत्यांना विचारला 'तो' प्रश्न

अभिनेत्री श्रद्धा कपूर ही बॉलीवूडमधील लोकप्रिय अभिनेत्री आहे. तिचे 'एक व्हिलन',' स्त्री', 'स्त्री २', 'आशिकी' असे अनेक चित्रपट गाजले आहेत. अभिनेत्रीचा चाहतावर्ग मोठा आहे.

श्रद्धा कपूर चित्रपटांतून प्रेक्षकांचे मनोरंजन करतेच, तर सोशल मीडियाच्या माध्यमातूनही ती प्रेक्षकांच्या भेटीला येते. विविध फोटो ती शेअर करत असते. काही वेळा ती मजेशीर व्हिडीओ शेअर करते. तिच्या अशा व्हिडीओंचे कौतुक होताना दिसते. चाहते तिच्या पोस्टवर विविध कमेंट्स करत त्यांची मते मांडतात, अभिनेत्रीचे कौतुक करतात. मात्र, आता श्रद्धा एका वेगळ्याच कारणामुळे चर्चेत आली आहे.

मराठी अभिनेत्री अपूर्वा नेमळेकरने सोशल मीडियावर एक फोटो शेअर केला आहे. या फोटोमध्ये एका बाजूला श्रद्धा कपूर आणि एका बाजूला स्वत: अपूर्वा आहे. दोघींच्या केसांची स्टाईल, चष्मा एकसारखाच असल्याचे दिसत आहे. हा फोटो शेअर करताना अपूर्वाने लिहिलेली कॅप्शनही लक्ष वेधून घेत आहे. अपूर्वाने लिहिले, "व्हाईब आणि चष्मे सारखेच आहेत, हे खरे आहे की मी फक्त कल्पना करत आहे?" पुढे तिने श्रद्धाला टॅग करत लिहिले की आपण ट्विनिंग करत आहोत का? त्यानंतर तिने चाहत्यांनादेखील विचारले की आम्ही सारख्याच दिसतो का?

आता अपूर्वाच्या या पोस्टवर अनेकांनी कमेंट्स केल्या आहेत. यामध्ये तिच्या पतीचाही समावेश आहे. तनुज गोवळकरने लिहिले, "मला फक्त इतकेच माहीत आहे की मी नशीबवान आहे." याबरोबरच, अनेक नेटकऱ्यांनी कमेंट्स केल्या आहेत. एकाने लिहिले, "सेम", दुसऱ्या एकाने लिहिले, "शेवंता आणि श्रद्धा", एकाने लिहिले, "तुम्ही सारख्याच दिसता. श्रद्धा प्लीज हे एकदा बघ", आणखी एकाने लिहिले, "तुलना करू नका, तुम्ही दोघीही सुंदर आहात", एकाने लिहिले, "तुम्ही दोघी एकसारख्या दिसत आहात", एकाने लिहिले, "श्रद्धा कपूरपेक्षा तर सुंदर तुम्हीच आहात", दुसऱ्या एकाने लिहिले, "तू खूप छान दिसतेस", एकाने लिहिले, "शेवंता, तू अगदी श्रद्धासारखीच दिसतेस", दुसऱ्या एकाने लिहिले, "तिच्यापेक्षा तर तू जास्त सुंदर दिसतेस", अशा अनेक कमेंट्स पाहायला मिळत आहेत.

अपूर्वा नेमळेकर मराठी टेलिव्हिजन इंडस्ट्रीमधील लोकप्रिय अभिनेत्री आहे. तिला 'रात्रीस खेळ चाले' या मालिकेतून मोठ्या प्रमाणात लोकप्रियता मिळाली. या मालिकेत तिने शेवंता ही भूमिका साकारली होती. त्यानंतर बिग बॉस मराठीच्या चौथ्या पर्वातूनही अभिनेत्रीला चांगलीच लोकप्रियता मिळाली. याबरोबरच, 'प्रेमाची गोष्ट' या मालिकेतील तिची सावनी ही भूमिकाही मोठ्या प्रमाणात गाजली. दरम्यान, आगामी काळात अभिनेत्री कोणत्या प्रोजेक्टमधून प्रेक्षकांच्या भेटीला येणार हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.



## मुख्यमंत्र्यांचं कौतुक करणं प्राजक्ताला भोवलं, 'हास्यजत्रेच्या स्कीटपेक्षा जास्त हास्यास्पद...' अंधारेंकडून खरडपट्टी

लोकप्रिय मराठमोळी अभिनेत्री प्राजक्ता माळी कायमच आपल्या खासगी गोष्टींमुळे चर्चेत असते. मग तीचा अभिनय असो किंवा तिचा 'प्राजक्तसाज'नावाचा ब्रँड. प्राजक्ता आपल्या अभिनय, निवेदन आणि नृत्याच्या माध्यमातून प्रेक्षकांसमोर येते. प्राजक्ता माळी आपल्या परखड आणि स्पष्ट बोलण्यादेखील ओळखली जाते. तसेच प्राजक्ता माळी अनेक राजकीय कार्यक्रमांमध्ये देखील उपस्थित राहते. प्राजक्ता माळीनुकतीच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या एका कार्यक्रमात उपस्थित होती. "नारी शक्ती वंदन' असं त्या महिला संमेलनाचं नाव होतं. या कार्यक्रमात प्राजक्ता माळीने मुख्यमंत्र्यांचं केलेलं कौतुक तिला चांगली भोवलं आहे. तिच्या कौतुकावर सुषमा अंधारे यांनी टिका केली आहे.



प्राजक्ता माळी या कार्यक्रमात म्हणाली होती की, महाराष्ट्रातील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे नाशिकमधील भोंदूबाबा प्रकरण अत्यंत कठारपणे सांभाळत आहे. यावरुन महिलांचा सन्मान कसा केला पाहिजे हे शिकलं पाहिजे. भोंदूबाबामुळे मुख्यमंत्र्यांनी हे प्रकरण अतिशय संवेदनशील हाताळत आहेत. अगदी बापाप्रमाणे कठोर आणि आईप्रमाणे ममत्व दाखवत आहे. महत्त्वाचं म्हणजे मुख्यमंत्र्यांवर अनेकदा टीका होते. विरोधी पक्षाकडून चिखलेकही केली जाते. पण मुख्यमंत्री कधीच त्या ट्रोलिंगवर चुकीचा शब्द वापरत नाहीत. त्यांनी टीव्हीवर अपशब्द वापरल्याचे आपण कधीच ऐकले नाही. प्राजक्ताने केलेल्या या कौतुकावर सुषमा अंधारेंनी टिका केली आहे.

अभिनेत्री प्राजक्ता माळीनं मुख्यमंत्र्यांचं जाहीरपणे कौतुक केल्यानंतर शिवसेना उबाठा गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी जोरदार टीका केली. सुषमा अंधारे यांनी त्यांच्या ट्विटरवर एक पोस्ट शेअर करुन लिहिलंय की, "प्राजक्ताजी तुम्ही हास्य जत्रेच्या निवेदिका आहात आणि हा कार्यक्रम आम्ही आवडीने बघतो... पण राज्यातल्या एकूण महिला लैंगिक शोषणाच्या एकाही प्रश्नावर ब्र शब्द न करणाऱ्या तुम्ही मुख्यमंत्र्यांच्या ब्रँडिंग वर बोलायला लागलात तर हास्यजत्रे मधल्या स्कीट पेक्षा सुद्धा ते जास्त हास्यास्पद वाटायला लागेल...", असं सुषमा अंधारे म्हणाल्या.

## तन्वी कोलतेला मराठी अभिनेत्रीचा पाठिंबा

बिग बॉस मराठीचा सहावा सीझन आता अंतिम टप्प्यात आला आहे. येत्या १९ एप्रिल रोजी शोचा महाअंतिम सोहळा पार पडणार आहे. त्यामुळे आपल्या आवडत्या स्पर्धकाला विजेता किंवा विजेती करण्यासाठी चाहते आणि कलाकार मंडळीसुद्धा पाठिंबा देत आहेत.



नुकतीच शोमधून रेवा कौरासे बाहेर पडली. त्यानंतर तन्वी, दीपाली, विशाल, अनुश्री आणि राकेश हे टॉप-५ स्पर्धक उरले आहेत. यांपैकी आवडत्या स्पर्धकाला जिंकवण्यासाठी अनेकजण सोशल मीडिया पोस्ट शेअर करत पाठिंबा देत आहे. दरम्यान, रेवा 'बिग बॉस'च्या घरातून बाहेर पडताना तन्वीने केलेल्या वक्तव्यामुळे तिला सध्या सोशल मीडियावर ट्रोलिंगला सामोरे जावे लागत आहे. तन्वी या शोमध्ये गेले काही दिवस चांगला खेळ खेळताना दिसली. त्यामुळे अनेकजण तन्वीच या शोची विजेती होऊ शकते, असं मत व्यक्त करत होते. मात्र, रेवा बाहेर पडताना तिने केलेल्या विधानामुळे अनेक प्रेक्षक तिच्यावर नाराज झाले आहेत.

रेवा बाहेर पडताना तन्वीने "खोटारडेपणा आणि धक्काबुक्की इथे राहिली आणि चांगल्या मनाची पोरगी बाहेर गेली", असं म्हटलं होतं. तिच्या या वक्तव्यावर नेटकरी आणि काही कलाकारांनी टीका केली आहे. मात्र, एका अभिनेत्रीने तन्वीला पूर्णपणे पाठिंबा दिला आहे. ही अभिनेत्री म्हणजे प्राजक्ता नवनाळे.

अभिनेत्री प्राजक्ता नवनाळेने तन्वीला पाठिंबा देणारी पोस्ट आपल्या इन्स्टाग्राम स्टोरीवर शेअर केली आहे. तसेच या पोस्टमधून तिने एका चुकीमुळे माणूस वाईट होत नसतो, असंही स्पष्टपणे म्हटलं आहे. या पोस्टमध्ये प्राजक्ता तन्वीबद्दल लिहिते, "बिग बॉसची खरी विजेती तूच आहेस. तुझा आतापर्यंतचा संपूर्ण प्रवास पाहिला तर तू खूप बिनधास्त आणि खंबीर मुलगी असल्याचे जाणवले. माणसाकडून एखादी चूक झाली म्हणजे तो माणूस वाईट होत नसतो. सध्या जरी तुझ्याबद्दल नकारात्मक चर्चा सुरू असली, तरी मला तू कुठेही खोटी (फेक) वाटत नाहीस. ही ट्रॉफी तुलाच मिळायला हवी. माझा तुला पूर्ण पाठिंबा आहे."

## राखी सावंतचे अनुश्री मानेबद्दल स्पष्ट वक्तव्य; म्हणाली, तिचा गेमच..

रिॲलिटी शोमध्ये सहभागी होणारा प्रत्येक स्पर्धक त्याची वेगळी रणनीती घेऊन आलेला असतो. शोमध्ये काय करायचे आहे, काय वागायचे आहे, इतर सहस्पर्धकांबरोबर कसे नाते असेल, अशा अनेक गोष्टींचा विचार स्पर्धक करतात. त्यांच्या वागण्या-बोलण्यानुसार सहस्पर्धक तसेच प्रेक्षक त्यांची मते तयार करतात.

सध्या 'बिग बॉस मराठी'चे सहावे पर्व अंतिम टप्प्यात आहे. १९ एप्रिल २०२६ ला या शोचा अंतिम सोहळा पार पडणार आहे. या पर्वात अनेक लोकप्रिय कलाकार, सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर सहभागी झाले होते. शोच्या सुरुवातीला एकूण १७ स्पर्धक सहभागी झाले, त्यानंतर चार वाईल्ड कार्ड स्पर्धकांची बिग बॉसच्या घरात एन्ट्री झाली.





असे एकूण २१ स्पर्धक सहाव्या पर्वाचा भाग झाले.

रितेश देशमुख सूत्रसंचालन करत असलेल्या या शोमध्ये स्पर्धकांमध्ये मतभेद, भांडणे, मैत्री, शत्रुत्व सर्व काही पाहायला मिळाले. आता राखी सावंतने बिग बॉसच्या घरातून बाहेर पडल्यानंतर विविध मुलाखतींमध्ये बिग बॉस मराठीच्या सहाव्या पर्वाबद्दल तिचे मत मांडले आहे. राकेश बापटवर तिचे एकतर्फी प्रेम असल्याचे तिने म्हटले आहे. तसेच, घरातील इतर स्पर्धकांच्या खेळाबद्दलही ती व्यक्त झाली आहे.

राखी सावंतने नुकताच 'लोकमत फिल्मी'शी संवाद साधला. यावेळी तिने राकेश बापट, तन्वी कोलते, विशाल कोटियन यांच्या खेळाबद्दल वक्तव्य केले. राखीने अनुश्रीबद्दल केलेले वक्तव्य चर्चेत आहे. ती म्हणाली, "अनुश्री खोटारडी आहे, मला तिचा गेमच आवडत नाही. पहिल्या दिवसापासून खरं बोललं पाहिजे. सुरुवातीला ती म्हणाली की मला काहीच येत नाही, आता सीझनच्या शेवटी स्वयंपाक करायला लागली, भांडी घासायला लागली; म्हणायचं म्हणून काहीही म्हणू नका."

पुढे राखी म्हणाली, "मी बघा किती राडे करते, पण मी सगळी कामं करते. मला सगळं येतं. खोटं बोलायचं नाही", असे म्हणत राखी सावंतने अनुश्री खोटारडी असल्याचे म्हटले. तसेच राकेश बापटच्या प्रेमात पडल्याची कबुलीदेखील राखीने दिली. तिचे एकतर्फी प्रेम असल्याचे तिने स्पष्ट केले. याबरोबरच, विशाल जवळचा मित्र असल्याचे राखीने सांगितले.

दरम्यान, आता सोशल मीडियावर नेटकरी, कलाकार त्यांचे आवडते स्पर्धक जिंकावे यासाठी पोस्ट शेअर करत आहेत. अनेक कलाकार घरातील स्पर्धकांच्या खेळावर त्यांची मते व्यक्त करत आहेत. तसेच, चाहते त्यांचे आवडते स्पर्धक जिंकावे यासाठी इतरांना वोट करण्याचे आवाहन करत आहेत.

# जलव्यवस्थापन ही काळाची गरज : सुरुवात स्वतः पासून करा -जिल्हाधिकारी डॉ. प्रवीणकुमार देवरे

## जिल्हा नियोजन सभागृहात जलव्यवस्थापन कृती पंधरवाड्याचे उत्साहात उद्घाटन

**बुलढाणा**

जलसंपदा विभागाच्या वतीने १५ ते ३० एप्रिल २०२६ या कालावधीत आयोजित पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जलव्यवस्थापन कृती पंधरवाड्याचा शुभारंभ स्थानिक जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन सभागृहात मोठ्या उत्साहात संपन्न झाला. जलव्यवस्थापन ही आजच्या काळाची अनिवार्य गरज असून, पाण्याचा काटकसरीने वापर आणि व्यवस्थापनाची सुरुवात प्रत्येकाने स्वतःपासून करावी, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी डॉ. प्रवीणकुमार देवरे यांनी यावेळी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हाधिकारी डॉ. प्रवीणकुमार देवरे होते. यावेळी पाटबंधारे प्रकल्प मंडळाचे अधीक्षक अभियंता बापूसाहेब गाडे, जिगाव प्रकल्पाचे अधीक्षक अभियंता श्रीराम हजारे, जलयुक्त शिवार अभियानाचे तज्ज्ञ सदस्य रामकृष्ण पाटील, तसेच कार्यकारी अभियंता सुनील बोरले, शरद नागरे, परमजितसिंग जुनेजा, तुषार मेतकर, प्रवीण चावरे आणि सपना डावरे यांची उपस्थिती होती. जलपूजनाने कार्यक्रमाचा प्रारंभ



कार्यक्रमाची सुरुवात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर व आद्य अभियंता सर एम. विश्वेश्वरैया यांच्या प्रतिमा पूजनाने आणि दीपप्रज्वलनाने झाली. विशेष म्हणजे, बुलढाणा जिल्ह्याची भाग्यरेखा ठरलेल्या पूर्णा, खडकपूर्णा, ज्ञानगंगा, नळगंगा व पैनगंगा या नद्यांच्या जलकलशाचे पूजन करून जिल्ह्याच्या जलसमृद्धीचा जागर करण्यात आला. आपल्या अध्यक्षीय भाषणात डॉ. देवरे पुढे म्हणाले की, नागरिकांमध्ये जलसाक्षरता वाढवणे आणि पाण्याच्या थेंबाथेंबाचे महत्त्व पटवून देणे हा या पंधरवाड्याचा मुख्य उद्देश आहे. जलव्यवस्थापनाच्या शाश्वत उपाययोजना राबविल्यास भविष्यातील पाणी संकट टाळता येईल. यावेळी रामकृष्ण पाटील, शरद नागरे, बापूसाहेब गाडे आणि श्रीराम हजारे यांनीही जलव्यवस्थापन व सिंचन विषयावर आपले विचार मांडले.

या पंधरवाड्यामध्ये शेतकरी पाणीवापर संस्थांशी संवाद, धरण व कालवा स्वच्छता अभियान, नदी प्रदूषण नियंत्रण व पांदण रस्ता दुरुस्ती, उपसा सिंचन तक्रारींचे निरसन व आपत्ती व्यवस्थापन मार्गदर्शन यांसारखे विविध लोकउपयोगी उपक्रम राबविले जाणार आहेत.

# राज्यस्तरीय इंग्रजी बेसिक कॉम्पीटीशन २०२६ मध्ये शितल अ‍ॅकॅडमीच्या विद्यार्थ्यांचे घवघवीत यश

**जनसंचलन/बुलढाणा**

स्थानिक शितल अकॅडमी बुलडाणा येथे राज्यस्तरीय इग्लिश बेसिक स्पर्धा २०२६ मध्ये प्राविण्य संपादित केलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार व बक्षिस वितरण सोहळा मोठ्या धुमधडाक्यात पार पडला आहे नुकत्याच २१ मार्च रोजी पार पडलेल्या स्टेट लेव्हल इंग्लिश बेसीक कॉम्पीटीशन मध्ये शितल अ‍ॅकडमीचे विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. स्पर्धा हि ३ गटात विभागलेली असुन ओपन अंडर १२ व मराठी बेसिक या गटातून प्रत्येकी३ विद्यार्थ्यी यांनी विजेते पद खेचून आणित आपले कौशल्य दाखविले खुल्या गटातून कु करूणा धुरंधर तृतीय, राजकुमार उबाळे द्वितीय, तर हर्षल करणार प्रथम तसेच अंडर १२ या गटातून




कु.प्रतिक्षा वानखेडे तृतीय,आर्यन वाघ द्वितीय, तर कु.स्वरा उबरहांडे पांगरी प्रथम तसेच मराठी गटातून रोशन मारकड तृतीय,रूद्रमाके द्वितीय, तर अथर्व कचोरे प्रथम क्रमांक मिळवीत अव्वल आले आहे. विजेत्यांचे स्मृतीचिन्ह सन्मानपत्र रोख १०१ रु व विशेष गिफ्ट देऊन सत्कार करण्यात आला आहे. या प्रसंगी प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष-प्रा.राजेंद्र बोरसे, प्रियल फाउंडेशनचे अध्यक्ष जिल्हा मानव अधिकारी सरंक्षण समितीचे उपसचिव भारत भोंडे,नाजुकराव उबरहांडे, श्री वानखेडे सर,डाभाचे सरपंच रविद्र पाडुरंग हागे,व आप्पाजी हे उपस्थित होते.

# खाजगी नोकरी इच्छुकांसाठी सुवर्णसंधी : २३ एप्रिल रोजी प्लेसमेंट ड्राइव्ह


**जनसंचलन/बुलढाणा**

जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार युवक-युवतींसाठी नोकरीची मोठी संधी उपलब्ध झाली असून, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र तथा मॉडेल करिअर सेंटर बुलढाणा आणि शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, चिखली यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २३ एप्रिल २०२६ रोजी पंडित दीनदयाल उपाध्याय प्लेसमेंट ड्राइव्हचे आयोजन करण्यात आले आहे. हा प्लेसमेंट ड्राइव्ह गुरुवारी सकाळी १० वाजता शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, चिखली (जि. बुलढाणा) येथे पार पडणार आहे. या उपक्रमामध्ये चिरायु पॉवर, खामगाव, क्रेडीट अ‍ॅक्सीस ग्रामीण, नांदुरा तसेच क्वीस कॉर्प, पुणे या नामांकित कंपन्यांनी त्यांच्या विविध रिक्त पदांची नोंदणी केली आहे. या रोजगार मेळाव्यात सहभागी होणाऱ्या उमेदवारांची प्रत्यक्ष मुलाखत कंपनी प्रतिनिधींमार्फत घेण्यात येणार असून, प्राथमिक निवडही याच ठिकाणी केली जाणार आहे. तसेच काही उमेदवारांना नामांकित कंपन्यांमध्ये प्रत्यक्ष प्रशिक्षणाची संधीही उपलब्ध होणार आहे.१० वी, १२ वी, आयटीआय तसेच पदवीधर पात्रता असलेले पुरुष व महिला उमेदवार या प्लेसमेंट ड्राइव्हमध्ये सहभागी होऊ शकतात.

# प्रशासकीय सेवेचा गौरव :उपजिल्हाधिकारी समाधान गायकवाड यांना राजीव गांधी गतिमानता पुरस्कार जाहीर

**जनसंचलन/बुलढाणा**

शासकीय कामकाजात पारदर्शकता, तत्परता आणि कार्यक्षमतेला चालना देण्यासाठी राज्य शासनाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता अभियान व स्पर्धाफ अंतर्गत उपजिल्हाधिकारी समाधान गायकवाड यांना त्यांच्या उल्लेखनीय कार्यासाठी राजीव गांधी गतिमानताफ पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. त्यांच्या या यशामुळे जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. प्रशासनात नाविन्यपूर्ण सुधारणा घडवून आणणे, प्रलंबित प्रकरणांचा जलद निपटारा करणे आणि सर्वसामान्य नागरिकांच्या कामांना गती देणे, या उद्देशाने हे अभियान दरवर्षी राबविण्यात येते. समाधान गायकवाड यांनी आपल्या कार्यकाळात विविध शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी करून प्रशासनाचा दर्जा उंचावण्यात मोलाची भूमिका बजावली आहे. तंत्रज्ञानाच्या प्रभावी वापरावर भर देत त्यांनी प्रशासन अधिक पारदर्शक व सुलभ करण्यासाठी अनेक डिजिटल उपक्रम राबविले. १०० वर्षांहून अधिक जुन्या दस्तावेजांचे डिजिटायझेशन, महसूल मित्र चॅटबॉट सेवा, ई-महसूल प्रणाली, डॅशबोर्ड आणि ङ्गसहजफ प्रणाली यांसारख्या उपक्रमांमुळे नागरिकांना शासकीय सेवा घरबसल्या उपलब्ध होऊ लागल्या आहेत. या उपक्रमांमुळे शासन आणि नागरिक यांच्यातील दरी कमी होण्यास मोठी मदत झाली आहे. तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर आणि प्रकरणांच्या निपटाऱ्यातील तत्परता यामुळेच त्यांच्या कार्याची दखल घेत त्यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. या गौरवामुळे महसूल विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रेरणा मिळणार असून, जिल्हाधिकारी कार्यालयातील वरिष्ठ अधिकारी तसेच विविध स्तरांतून समाधान गायकवाड यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. हा पुरस्कार त्यांच्या कर्तव्यनिष्ठा, कार्यक्षमता आणि प्रशासनातील मोलाच्या योगदानाची पोचपावती असल्याची भावना व्यक्त होत आहे.



# केंद्र शासनाच्या योजनांचा केंद्रीय आयुष व कुटूंब कल्याण राज्यमंत्री यांनी घेतला आढावा

## योजनांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवा - ना. प्रतापराव जाधव

जनसंचलन/बुलढाणा

केंद्र शासनाच्या विविध योजनांचा लाभ तळागाळातील शेवटच्या घटकापर्यंत प्रभावीपणे पोहोचवावा, असे निर्देश केंद्रीय आरोग्य व कुटूंब कल्याण राज्यमंत्री तथा ङ्कदिशाफ समितीचे अध्यक्ष प्रतापराव जाधव यांनी दिले. बुलढाणा जिल्ह्यातील केंद्रीय योजनांच्या प्रगती आढावा घेण्यासाठी मंगळवारी जिल्हा विकास समन्वय व संनियंत्रण अर्थात ङ्कदिशाफ समितीची बैठक जिल्हा नियोजन समिती सभागृहात पार पडली. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी केंद्रीय राज्यमंत्री तथा खासदार ना. प्रतापराव जाधव हे होते. या बैठकीला जिल्हाधिकारी डॉ. प्रविणकुमार देवरे, मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात, यांच्यासह उपजिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. बैठकीच्या प्रारंभी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जल व्यवस्थापन कृती पंधरवडा मोहिमेअंतर्गत जलकुंभ पूजन केंद्रीय राज्यमंत्री श्री. जाधव यांच्या हस्ते झाले. त्यानंतर पाण्याच्या काटकसरी वापराबाबत उपस्थितांना जलप्रतिज्ञा देण्यात आली. केंद्रीय राज्यमंत्री ना. प्रतापराव जाधव यांनी जिल्ह्यातील सिंचन प्रकल्पाचा आढावा घेतला. यावेळी सिंचन प्रकल्पबाधीतांच्या पुनर्वसन आणि भूसंपादन प्रक्रियेची माहिती घेतली. यात भूसंपादन प्रक्रियेबद्दल लोकांच्या तक्रारींचे निराकरण करावे. बुडीत क्षेत्रातील बाधीतांचे ज्या ठिकाणी पुनर्वसन केले जात आहे त्या ठिकाणी रस्ते, पाणी, वीज आदी पायाभूत सुविधा उपलब्ध करुन द्यावे. यासह जिगांव सिंचन प्रकल्पातील उपलब्ध पाण्याचे नियोजन करावे. पुनर्वसन गावांना प्रत्यक्ष भेटी देवून पाहणी करण्याचे निर्देश अधिकाऱ्यांना दिले. यावेळी ना. प्रतापराव जाधव यांनी प्रधानमंत्री पीक विमा योजनेचा आढावा घेतला. २०२४-२५ वर्षात खरीप आणि रब्बी हंगामांतर्गत बुलढाणा जिल्ह्यातील सुमारे ५ लाख ८८ हजार ४२८ शेतकऱ्यांना ७१२ कोटी रुपये रक्कमेचा पीक विमा नुकसान भरपाई वितरित करण्यात आले आहे. या शिवाय सन २०२५-२६ खरीप व रब्बी हंगामातील पीक विम्याची प्रक्रिया सुरु असून लवकरच शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे जमा होणार आहेत. तसेच ३ लाख ५३ हजार ५१२ लाभार्थ्यांचे ई-केवायसी पूर्ण झाली असून २ हजार ४९५ प्रलंबित आहे, अशी माहिती कृषी विभागाने दिली. त्याबाबत ई-केवायसी तसेच मयत झालेल्या व वारसा हक्क अभावी या योजनेचा लाभ न मिळालेल्या शेतकऱ्यांना संपर्क करुन त्यांना योजनेचा लाभ द्यावा. यासाठी तलाठी, ग्रामसेवक व कृषी सेवाकांनी गावनिहाय भेटी देवून कृषी योजनांची माहिती व त्याचा लाभ शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवा. तसेच शेतीमध्ये पिकविले जाणारे पिकांची पारदर्शकपणे नोंद घेऊन पिक विमा, नुकसान भरपाईचा लाभ मिळवून द्यावा. अडचणी असलेल्या शेतकऱ्यांना योग्य मार्गदर्शन करा त्यांचे प्रश्न सोडवा, असे निर्देश केंद्रीय राज्यमंत्री ना. प्रतापराव जाधव यांनी दिले. मुख्यमंत्री सौर वाहिनी योजनेंतर्गत शेतकऱ्यांना दिवसा विज मिळावी यासाठी आवश्यक ते उपाययोजना करावे. प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत शालेय विद्यार्थ्यांना पोषण आहार दिला जातो. या आहाराची नियमितपणे तपासणी करुन चांगल्या प्रतीचा आहार विद्यार्थ्यांना मिळेल याची खात्री करावी. सीएससी सेंटर, आधार सेवा केंद्रांवर नागरिकांची लुट सुरु असल्याच्या तक्रारी असून अशा केंद्रांची तपासणी करा, आढावा घेवून कारवाई करा, अशा सूचना केंद्रीय राज्यमंत्री ना. प्रतापराव जाधव यांनी अधिकाऱ्यांना दिल्या. या बैठकीत ना. प्रतापराव जाधव यांनी प्रधानमंत्री सुर्यघर योजना, मनरेगा, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, १५ वा केंद्रीय वित्त आयोग, गृहनिर्माण योजना, जलजीवन मिशन, अटल भूजल योजना, मजीप्रा, पाणी टंचाई निवारनार्थ उपयोजना, स्वच्छ भारत मिशन, राष्ट्रीय आरोग्य योजना, प्रधानमंत्री जनआरोग्य योजना, प्रधानमंत्री विश्वकर्मा योजना, कौशल्य विकास योजना, पीएम श्री शाळा, डिजिटल इंडिया, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, राष्ट्रीय महामार्ग, रेल्वे प्रकल्प, नगरपरिषदेच्या योजना, नवीन शैक्षणिक प्रकल्पांचा सविस्तर आढावा घेतला.

## अण्णासाहेब पाटील महामंडळाचे मोबाईल ॲप सुरु; योजनांची प्रक्रिया आता थेट मोबाईलवर

जनसंचलन/बुलढाणा

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळामार्फत लाभार्थ्यांसाठी डिजिटल सेवांकडे मोठे पाऊल टाकत ङ्क मफ हे मोबाईल ॲप सुरू करण्यात आले आहे. हे ॲप वर उपलब्ध असून, लाभार्थ्यांना आता योजनांची संपूर्ण प्रक्रिया थेट मोबाईलवर करता येणार आहे. महामंडळाच्या योजनांसाठी .... हे संकेतस्थळ आधीपासून कार्यरत असून, संपूर्ण कार्यपद्धती ऑनलाईन करण्यात आली आहे. मात्र, यापूर्वी अर्ज प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी संगणक किंवा सायबर कॅफेचा आधार घ्यावा लागत असल्याने लाभार्थ्यांना वेळ व खर्च वाढत होता. काही ठिकाणी एजंटमार्फत फसवणुकीच्या घटनाही घडत होत्या. या पार्श्वभूमीवर महामंडळाने नागरी सुविधा केंद्र व आपले सरकार केंद्रांशी करार करून प्रति सेवा ८५ रुपयांदराने सेवा उपलब्ध करून दिली होती. आता नव्याने विकसित करण्यात आलेल्या मोबाईल ॲपमुळे लाभार्थ्यांना अधिक सुरक्षित, सुलभ व स्वयंपूर्ण सेवा मिळणार आहे. नवीन वापरकर्त्यांनी मोबाईल क्रमांक, नाव व ई-मेलद्वारे पडताळणी करून नोंदणी करता येणार आहे, तर पूर्वी नोंदणीकृत लाभार्थ्यांना लॉगिन आयडी व पासवर्डद्वारे पुढील प्रक्रिया सुरू ठेवता येईल. महामंडळाच्या योजनांमध्ये , आणि असे तीन टप्पे असून आवश्यक कागदपत्रे ॲपद्वारे अपलोड करता येणार आहेत. अर्जाची स्थिती तपासणे, अद्ययावत माहिती मिळवणे आणि पुढील कार्यवाही करणे या सुविधा ॲपमध्ये उपलब्ध आहेत. त्यामुळे प्रक्रिया अधिक जलद, पारदर्शक आणि सोयीस्कर होणार आहे. सध्या क्लेम सादर करणाऱ्या तसेच नव्याने मंजूर झालेल्या




लाभार्थ्यांसाठी व्यवसायाचे जिओ-टॅग केलेले छायाचित्र अपलोड करणे अनिवार्य करण्यात आले आहे. या छायाचित्रांची पडताळणी जिल्हा समन्वयकांमार्फत केली जाणार असून, यासाठी जिओ-टॅगिंग व जिओ-फेन्सिंग तंत्रज्ञानाचा वापर केला जाणार आहे. गूगल नकाशाच्या सहाय्याने व्यवसायाची प्रत्यक्ष पाहणीही सुलभ होणार आहे. ही माहिती महामंडळाच्या प्रणालीशी संलग्न करण्यात येणार असून, पुढील टप्प्यात ही सुविधा मोबाईल ॲपमध्ये उपलब्ध होणार आहे. संगणकावरील सर्व सुविधा मोबाईलवर उपलब्ध करून देण्यात आल्याने लाभार्थ्यांनी मोठ्या प्रमाणावर ॲप डाउनलोड करून या डिजिटल उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन महामंडळामार्फत करण्यात आले आहे.

## भारतीय सशस्त्र दलात अधिकारी होण्यासाठी विनामुल्य एसएसबी प्रशिक्षण

जनसंचलन/बुलढाणा



भारतीय सैन्यदल, नौदल व वायुदलामध्ये अधिकारी पदावर भरती होऊ इच्छिणाऱ्या पात्र युवक-युवतींसाठी महाराष्ट्र शासनातर्फे मोफत पूर्व प्रशिक्षणाची सुवर्णसंधी उपलब्ध झाली आहे. छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक येथे दि. ४ ते १३ मे २०२६ या कालावधीत एसएसबी () कोर्स क्र. ६५ आयोजित करण्यात आला आहे. या प्रशिक्षणासाठी निवड झालेल्या उमेदवारांनी दि. ३ मे २०२६ रोजी सकाळी १० वाजता प्रशिक्षण केंद्रात हजर राहणे आवश्यक आहे. प्रशिक्षण कालावधीत उमेदवारांना निःशुल्क प्रशिक्षणासोबतच निवास व भोजनाची सोय उपलब्ध करून दिली जाणार आहे. सदर प्रशिक्षणासाठी पात्र ठरण्यासाठी उमेदवारांनी () किंवा () परीक्षा उत्तीर्ण केलेली असावी व मुलाखतीसाठी पात्रता मिळवलेली असावी. तसेच स्पेशल एन्ट्री, टेक्निकल ग्रॅज्युएट कोर्स किंवा युनिव्हर्सिटी एन्ट्री स्कीम अंतर्गत कॉल लेटर असलेले उमेदवारही अर्ज करू शकतात. इच्छुक उमेदवारांनी संबंधित जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयात निर्धारित तारखेला मुलाखतीस उपस्थित राहावे. मुलाखतीस येताना यांच्या अधिकृत संकेतस्थळावरून -६५ कोर्सचे प्रवेशपत्र डाउनलोड करून त्याची प्रिंट तसेच आवश्यक परिशिष्टे भरून सोबत आणणे बंधनकारक आहे. अधिक माहितीसाठी छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक येथे ई-मेल (training.petenashik@gmail.com) किंवा दूरध्वनी क्रमांक ०२५३-२४५१०३२ तसेच व्हॉट्सॲप क्रमांक ९१५६०७३३०६ वर कार्यालयीन वेळेत संपर्क साधण्याचे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी केले आहे.